## अस्तित्व

तू असतोसच माझ्या मनांत
तना-मनांत कायम असतोस
मातीत रुजलेल्या बीजासारखा
रुजून येतोस कधी तरी
कोंब अंकुरतो, दंवाने शहारतो
जाणवतं मला तुझं अस्तित्व
धुक्याच्या पल्याड, साता समुद्रापार
आणि शोधत बसते मी तुला --
कदाचित तुझ्यातल्या मला
का माझ्यातल्याच मला...
नक्की शोध कशाचा
हेही एक कोडंच
कधीच न उलगडणारं
नकोच उलगडायला ते
कोडं सोडवते आहे म्हणून
माझी मी आहे --
माझ्यातल्या तुझ्या अस्तित्वात
गुरफटलेली, हरवलेली
माझी मी, का तुझी मी --
एक अनुत्तरित प्रश्न
असण्याची जाणीव देणारा
असण्याची जाणीव देणारा !!

**लीना माटे**